# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली.

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना व प्रशासन विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

email:- gug.registrar@gmail.com दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४ email:-gondwanaesst@gmail.com


जा.क्र. गो.वि./आस्था./१६६८/२०२३

दि.२५ /०६/२०२३

## अधिसुचना

संदर्भ :- पत्र क्र.RB/GUG-2023/CR-523/Edn.1/838, राजभवन मलबार हील मुंबई

गोंडवाना विद्यापीठाचा दहावा दीक्षांत समारंभ बुधवार **दि. ५ जुलै, २०२३** रोजी सकाळी १०.३० वाजता गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे संपन्न होणार आहे. सदर दीक्षांत समारंभाला मुख्य अतिथी म्हणुन श्रीमती. द्रौपदी मुर्मू महामहीम राष्ट्रपती, भारत सरकार हया उपस्थित राहणार असून श्री. रमेश बैस, मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य तथा मा. कुलपती, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली हे अध्यक्षस्थान भुषवणार आहेत. या समारंभात विशेष अतिथी म्हणुन श्री. एकनाथ शिंदे, मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, श्री. नितीन गडकरी मा. मंत्री रस्ते वाहतुक व महामार्ग भारत सरकार, श्री. देवेंद्र फडणवीस, मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, इत्यादी उपस्थित राहणार असुन श्री. चंद्रकांतदादा पाटील मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, श्री. सुधीर मुनगंटीवार, मा. मंत्री, वने, सांस्कृतिक व मत्स्य व्यवसाय, महाराष्ट्र राज्य. गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरु मा. डॉ. प्रशांत बोकारे व प्र-कुलगुरु मा. डॉ. श्रीराम कावळे यांची विशेष उपस्थिती राहणार आहे.

सदर समारंभामध्ये मा. अध्यक्ष, अतिथी, अधिसभा, व्यवस्थापन परिषद, विद्यापरिषद व विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणे/मंडळे व समित्यांचे सन्माननिय सदस्य यांच्या उपस्थितीत विशेष गुणवत्ता प्राप्त व प्रावीण्य प्राप्त विद्यार्थी व विद्यार्थीनींना सुवर्ण पदक, आचार्य पदवी व पदवी प्रदान करण्यात येणार आहे.

त्याअनुषंगाने विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांचे संस्थाचालक, प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी तसेच विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी यांनी **बुधवार दि. ५ जुलै, २०२३ रोजी सकाळी ९.०० वाजे**पुर्वी दहाव्या दीक्षांत समारंभास उपस्थित राहावे, हि नम्र विनंती.

**मा. कुलगुरु महोदयांच्या मान्यतेने**

**(डॉ. अनिल हिरेखण)**
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी:-**

१. महामहीम राष्ट्रपती यांचे सचिव राष्ट्रपती भवन न्यु दिल्ली.
२. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन मलबार हिल, मुंबई.
३. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण, विभाग मुंबई.
४. मा. संचालक, उच्च व तंत्र शिक्षण, विभाग पुणे.
५. मा. सहसंचालक, उच्च व तंत्र शिक्षण, नागपुर विभाग नागपुर.
६. मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,गडचिरोली.
७. मा. कुलगुरु यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
८. मा. प्र-कुलगुरु यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
९. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांनी सदर अधिसुचना कृपया, आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावे.
१०. मा. सर्व शैक्षणिक तसेच प्रशासकीय विभाग प्रमुख/युनिट प्रमुख, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांनी सदरहू अधिसुचना कृपया, आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावे.
११. सिस्टीम ॲनालिस्ट, संगणक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना सुचित करण्यात येते की, सदर अधिसुचना विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.
१२.आस्थापना व प्रशासन विभाग(नस्ती), गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**(डॉ. कामाजी देशमुख)**
उपकुलसचिव (प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली